सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**

एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,

E-MAIL ID – lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

**प्रेस नोट क्र. ०८** **दिनांक :- १३/०३/२०२४**

# स्थानिक गुन्हे शाखा ठाणे ग्रामीणचे कारवाईत महाराष्ट शासानाने प्रतिबंधीत केलेला ७०,०९,०००/- रुपये किमतीचा गुटखा जप्त, एकुण १ आरोपीतास अटक

मा. पोलीस अधीक्षक श्री. डॉ. डी. एस. स्वामी ठाणे ग्रामीण, तसेच श्रीमती डॉ. दिपाली धाटे, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी ठाणे ग्रामीण पोलीस दलाच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला व मानवी शरीरास अपायकारक गुटखा खरेदी/विक्री व वाहतुक यांना प्रतिबंध करणे व त्यावर करवाई करणेबाबत आदेश देण्यात आहे आहे. त्यानुसार श्री. सुरेश मनोरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांनी जिल्हयात अशा प्रकारचे प्रतिबंधीत गुटखा खरेदी/विक्री तसेच वाहतुकी बाबत गोपनीय माहीती मिळवुन कारवाई करणेकामी वेगवेगळे पथक तयार करुन त्यांना मार्गदर्शन केले.

मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व आदेशा प्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेची वेग-वेगळी पथके अथक परीश्रम घेवुन प्रतिबंधीत गुटख्याची वाहतुक करणारे यांचेबाबत गोपनीय माहीती प्राप्त करीत असतांना दिनांक २७/०२/२०२४ रोजी वडपे चौकी येथे ११.०० वाजता आलो असता, पोहवा/१५४२ उमेश ठाकरे यांना त्याचे गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, नाशिक बाजुकडुन दोन टाटा टेम्पो क्र. एमएच-०४-केएफ-९८५७ व एमएच-४३-बीएक्स-३४९१ याचेत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा हा माल भरुन मुंबई बाजुकडे जात आहे अशी खात्रीशिर माहीती मिळाल्याने, नमुद पोलिस पथक भिवंडी तालुका पोलीस ठाणे हद्दीमध्ये मुंबई-नाशिक हायवे रोडवरील अलहिंद धाब्याचे जवळ नाशिक-मुंबई हायवेच्या दक्षिण वाहीनी लगत असलेल्या भारत टाईल्स ॲण्ड स्टोनस या दुकानाचे समोर ता. भिवंडी जि. ठाणे येथे बातमीदार यांनी सांगितले प्रमाणे गस्त करुन उभे असतांना सकाळी ११.१० वाजताच्या दरम्यान सदर ठिकाणी दोन्ही टेम्पो १) एमएच-०४-केएफ-९८५७ २) एमएच-४३-बीएक्स-३४९१ आडवुन सदर टेम्पोची दोन पंचासमक्ष झडती घेतली त्यामध्ये दिलबाग पान मसाला, डिएन-ए प्लस चेवींग तंबाखु, SHK गुटखा, ROYAL 1000 या कंपनीचा मानवी आरोग्यास अपायकारक व महाराष्ट्र शासनाने तंबाखुजन्य गुटखा किंमत ७०,०९,०००/- रुपये किमतीचा (सत्तर लाख, नऊ हजार पाचशे रुपये मात्र ) माल मिळुन आला.

सदर कारवाईमध्ये टेम्पो क्रमांक १) एमएच-०४-केएफ-९८५७ २) एमएच-४३-बीएक्स-३४९१ मधील वर नमुद किंमतीच्या मुद्देमाल टेम्पोसह सह गुन्हयाचे पुढील तपासकामी जप्त करण्यात आले तसेच त्यावरील चालक नामे १) कुशल लाल नानु जाट, वय ३२ वर्षे, व्यवसाय- ड्रायव्हर रा. गाव- सुरजपुरा, पो.कडीला, पोलीस ठाणे- डिक्की नौक्कड, ता.मालपुरा, जि. टोंक राजस्थान ३०४५०१ यास ताब्यात घेवुन पोहवा/१५४२ उमेश पांडुरंग ठाकरे वय ४२ वर्षे नेमणुक-

स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भिवंडी तालुका पोलिस ठाणे गुन्हा नोंद क्र. I ११२/२०२४, भारतीय दंड संहिता कलम ३२८, २७२, २७३, १८८,३४ सह अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ चे कलम ३(१) (झेड) (झेड) (आय), २६ (२) (आय) (४), २७ (१), ३० (२) (ए) व अन्न सुरक्षा आयुक्त याचे दिनांक १८ जुलै २०२३ चे आदेश क्र. अ. सु. मा. अ. अधिसुचना/ ४९६/ ७ चे उल्लघन करुन शिक्षा पात्र कलम ५९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मा वरिष्ठांचे आदेशा प्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे सहा. पोलिस निरीक्षक/ राजकुमार पोवार हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. डॉ. डी. एस. स्वामी ठाणे ग्रामीण, तसेच श्रीमती डॉ. दिपाली धाटे, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी दिलेल्या आदेश व सुचनां प्रमाणे श्री. सुरेश मनोरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/राजकुमार पोवार, पोहवा/१५४२ उमेश पांडुरंग ठाकरे, पोहवा/२७६ हनुमान बंधु गायकर, पोहवा/४८८ सुहास गंगाधर सोनवणे, पोहवा/२२३६ धनाजी कृष्णा कडव, पोहवा/३१२९ भगवान तुकाराम सोनवणे, पोना/३०१२ योगेश महादु शेळकंदे, पोना/१७२१ जितेंद्र दिनकर वारके, या पथकाने कौशल्यपुर्ण उल्लेखनिय कामगिरी केला आहे.

********************************************************************